# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०५/२०२४ (सोमवार) दुपार


### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
### वाहनासह एकुण ६,०३,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १९/०५/२०२४ चे ०७.१० वा. दरम्यान पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे रामटेक परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, काचुरवाही ते मसला रोडवर ट्रॅक्टर ट्रॉली द्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून काचुरवाही ते मसला रोडवर नाकाबंदी करून रेती वाहतुक करणारा ट्रॅक्टर क्र. एम एच— २९/ए डी— ९४०१ व ट्रॉली क्र. एम एच ४०/एल— ९०८२ चा चालक **आरोपी नामे— बबलु उर्फ भिमराव बळीराम पिते, वय ५० वर्ष, रा. चोखाळा पोस्ट अरोली ता. रामटेक** यास स्टाफच्या मदतीने हात दाखवून थांबण्याचा ईशारा केला असता पोलीसांना पाहून ट्रॅक्टर रोडच्या बाजूला थांबवून तेथून चालक पळून गेला. घटनास्थळाहुन सदर लाल रंगाचे ट्रॅक्टर क्र. एम एच—२९/ए डी— ९४०१ व ट्रॉली क्र. एम एच—४०/एल— ९०८२ किंमती ६,००,०००/— रू. सदर ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये १ ब्रास रेती कि. ३०००/—रु ची मिळून आली. ट्रॅक्टर ट्रॉली रेतीसह असा एकुण किंमती ६,०३,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीचा रामटेक पोलीसांनी शोध घेवुन आज दि. २०/०५/२०२४ रोजी आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगोले, नापोशि प्रफुल रंधई, मंगेश सोनटक्के, पोशि धिरज खंते, शरद गिते यांनी पार पाडली.




## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## वाहनासह एकुण ३५६००००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत दिनांक १९/०५/२०२४ रोजी टिप्परद्वारे अवैध रेती वाहतुक केली जात आहे. अशा मिळालेल्या गोपनिय माहीती वरुन पोलीस स्टेशन भिवापूरचे पथकाने पोस्टे हद्दीत मौजा तास कालोनी जवळ व मौजा मानोरा फाटा येथे नाकाबंदी लावुन अवैध वाहतुक करणारे एकूण २ टिप्पर थांबवुन तपासले असता १) १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/बी एल—६१९१ किंमती २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ५ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. ३०,०००/—रू. २) टिप्पर क्र. एम एच— ४०/बी जी—७७५० किंमती १५,००,०००/—रू. व त्यामध्ये ६ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किंमती ३०,०००/—रू. असे रेतीसह टिप्पर ताब्यात घेवुन असा एकूण दोन्ही वाहनासह ३५६००००/— रु. चा मुददेमाल जप्त केला आहे.

त्यावरुन १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/बी एल—६१९१ चा चालक **आरोपी नामे— १) संदीप अरूण मदनकर, वय ३२ वर्ष रा. येनोडा ता. पवनी जि. भंडारा व मालक २) राकेश रमेशजी गेडाम रा. तास कालोनी ता. भिवापुर जि. नागपुर** तसेच टिप्पर क्र. एम एच— ४०/बी जी—७७५० चा चालक **आरोपी नामे— ३) अश्विन कुलदिपक मेश्राम, वय २५ वर्ष, रा. कोरंभी ता. पवनी जि. भंडारा ४) मालक नामे— दुर्गेश शिवशंकर ब्रम्हे वय २९ वर्ष रा. वार्ड क्र २३ उमरेड ता. उमरेड जि. नागपुर ५) गाडी मालक प्रणय नरेंद्र हरडे, रा. गाडगेबाबा ले आऊट शिवमंदीर हनुमान नगर ता. नागपुर जि. नागपुर ६) घाट मालक रा. वलनी ता. पवनी जि. भंडारा** अशा एकूण ०६ आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवी सहकलम ४८(७), ४८(८) महा जमीन महसुल अधिनियम १९६६,

सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनीक मालमत्ताचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. यातील आरोपी क्र. १), ३) व ४) यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, पोउपनि संदीप सडमेक, परी. पोउपनि किरण महागावे, पोहवा आनंद धात्रक, राकेश त्रिपाठी, पोशि स्वप्नील ठाकरे, वासुदेव समर्थ, प्रितम खोपे यांनी पार पाडली.




---

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर